# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०६ डिसेंबर, २०१६ अग्रहायण १५, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(३)** | **कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४९**

---

### करी रोड, मुंबई येथे वन अविघ्न टॉवर उभारताना बनावट कागदपत्रे सादर करुन शासनाची केलेली फसवणूक

**(१) * ६८८५४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करी रोड, मुंबई येथील रेल्वे स्थानकांजवळ सन २००८ पर्यंत अस्तित्वात असलेल्या हाजीकासम चाळ आणि न्यू इस्लाम मिलची जागा ताब्यात घेवून क्लस्टर अर्बन रिडेव्हलपमेंट योजनेंतर्गत ५४ मजली ‘वन अविघ्न टॉवर’ उभारताना बनावट बोगस कागदपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक करून रुपये २ हजार कोटींचा गैरव्यवहार केल्याची बाब माहिती अधिकार कार्यकर्ते विनोद जैन यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आणून सदर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन अविघ्न या प्रमुख कंपनीने त्यांची सहकारी कंपनी असाध्य डेव्हलपर्स आणि नीश डेव्हलपर्स नावाची कंपनी स्थापन करुन न्यू इस्लाम मिलच्या जागेवर कोणतेही गाळे अस्तित्त्वात नसताना संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने बनावट कागदपत्रे तयार करून दिनांक ३० सप्टेंबर, १९६९ पासून ४६ कमर्शियल गाळे असल्याचे दाखवून 'टीकाशीट' मध्ये फेरफार केले तसेच वास्तुविशारद विकासक आणि म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी बोगस पध्दतीने बनविलेला फेरफार नकाशा 'प्रमाणित' करून 'अधिकृत' बनवला आणि मूळ जागेवर १.३३ इतका एफएसआय मिळणे अपेक्षित असतानाही कागदोपत्री कमर्शियल गाळे दाखवून ४ एफएसआय मिळावा यासाठी फेरफार केलेला खोटा नकाशा व गाळेधारकांची खोटी यादी जोडून म्हाडा कार्यालयात सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या ३३(९) नियमाप्रमाणे अर्बन रिन्युअल्स योजनेसाठी कमीत कमी ७५ टक्के जागा उपकर प्राप्त असावी असा नियम असतानाही नीश डेव्हलपर्स ने बांधलेल्या या टॉवरच्या जागेवर केवळ २५ टक्के बांधकामे उपकर प्राप्त असतानाही या बांधकामाला परवानगी देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इमारतींचे प्रस्ताव व नकाशे मंजूर करताना घातलेल्या अटीनुसार विकासकाने बांधकाम सुरू करण्यापूर्वी वाहतूक व नियोजन विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असतानाही सदर नाहरकत प्रमाणपत्र अद्यापही अविघ्न पार्क उभारणाऱ्या नीश डेव्हलपर्स यांनी घेतलेले नाही तरीही या टॉवरला भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित विकासक व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

इमारतीचे प्रस्ताव व नकाशे मंजूर करताना विकासकाने वाहतूक व नियोजन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. अभिन्यासातील इमारत क्र. १ व ३ साठी म्हाडाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे विकासकास भागश: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील पी. सी. टेक्नोलॉजी प्रा. लि. या कंपनीने नोकरी देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत

**(२) * ६५५०८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील वागळे इस्टेट परिसरातील “अशर” आयटी पार्क आणि घोडबंदर येथील एम्बेसी पार्क मध्ये पी.सी. टेक्नॉलॉजी या संगणक प्रणाली विकसित करणा-या कंपनीने माहे फेबुवारी, २०१६ मध्ये कार्यालय उभारून बीई आणि बीटेक पदवी मिळविलेल्या मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुण्यासह अन्य भागातील अडीच ते तीन हजार उमेदवारांना कायमस्वरुपी नोकरी देण्याचे आमिष दाखवून

प्रशिक्षणाच्या नावाखाली तब्बल ११ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदरहू प्रकरणी नोकरी लावण्याचे आमिष दाखविल्याप्रकरणी उमेदवारांकडून Refundable Deposit म्हणून प्रत्येकी रु.२५ हजार एवढी रक्कम परत न देता ऑफिस बंद करुन सुमारे दिड कोटी रुपयांचा अपहार करुन फसवणूक केल्याप्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील वागळे इस्टेट परिसरातील पी.सी. टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेट कंपनीच्या तीन संचालकांविरुध्द गु.रजि.क्र. २२९/२०१६ भा.दं.वि. कलम ४०६,४२०, १२०(ब) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणातील आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध घेण्यात येत असून त्यांना एल.ओ.सी.वर ठेवण्यात आले आहे. प्रस्तुतचे प्रकरण तपासाधीन आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई पोलीस दलातील काही अधिकारी व इतर गुंतवणूकदारांना व्याजाचे आमिष दाखवून फसवणूक करण्यात आल्याबाबत

**(३) * ६९८१३ श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस दलातील काही अधिकारी व इतर गुंतवणुकदारांना गुंतवणूकीच्या रक्कमेवर १८० टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवून सुमारे ७०० ते १००० कोटी रुपयांची फसवणूक करुन मोहनप्रसाद श्रीवास्तव व त्यांचे कुटुंबिय फरार झाल्याचे श्री. केदार गानला यांनी केलेल्या तक्रारीमुळे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय भ्रष्टाचार आणि अपराध निवारक परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन कृष्णन यांनी गुंतवणूकदारांच्या वतीने मा.मुख्यमंत्री, मा.गृह राज्यमंत्री आदींकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निवेदन सादर करून याप्रकरणी आर्थिक गुन्हे विरोधी विभागामार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,
(२) व (३) सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने वनराई पोलीस ठाणे गु. र. क्र.२२३/१६ कलम ४०६, ४०९, ४२०, १२०ब, भा. दं. वि.सह कलम ३, ४ एम.पी.आय.डी. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हा क्र. ७३ / २०१६ अन्वये आर्थिक गुन्हे विभागाकडे पुढील तपासकामी प्रकरण वर्ग करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वेलंग (ता. वाई, जि. सातारा) येथील मंगला जेधे यांच्या हत्ये प्रकरणी बोगस डॉक्टर संतोष पोळ यांना झालेली अटक

**(४) * ६६९९६ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेलंग (ता. वाई, जि. सातारा) येथील मंगला जेधे यांच्या हत्ये प्रकरणी धोम गावातील बोगस डॉ. संतोष पोळ यांना दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉ. संतोष पोळ यांनी गत १३ वर्षात सहा खून केल्याची कबुली दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर बोगस डॉक्टरवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) डॉ.संतोष गुलाबराव पोळ यांना दि.११/०८/२०१६ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

(२) डॉ.संतोष पोळ याने ६ खून केल्याची कबूली दिली आहे.

(३) होय,

सदर प्रकरणामध्ये वाई पोलीस ठाणे जि.सातारा येथे खालील प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

१) गु.र.नं. १५८/२०१६ भा.दं.वि. कलम ३६५, ३६४, ३०२, २०१, १२०(ब), ३९७, ४०४, ३४

२) गु.र.नं. १७५/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१, १२०(ब) ३९७, ४०४, ३४

३) गु.र.नं. १७६/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१, १२०(ब), ३९७, ४०४, ३४

४) गु.र.नं. १७७/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१

५) गु.र.नं. १७८/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१, ४०४

६) गु.र.नं. १७९/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१

सदर गुन्ह्यापैकी गु.र.नं. १५८/२०१६, १७५/२०१६ व १७६/२०१६ या गुन्ह्यात आरोपी संतोष गुलाबराव पोळ व त्याची साथीदार ज्योती पांडुरंग मांढरे यांचे विरुध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी वाई यांचे न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले आहे. उर्वरित ३ गुन्ह्यांचा तपास सुरु आहे. यातील आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## सातीवली (जि. पालघर) येथे दहशतवाद विरोधी पथकाने छापा टाकून सुमारे १५ किलो आरडीएक्सचा साठा जप्त केल्याबाबत

**(५) * ७१३०३ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातीवली (जि. पालघर) गावात मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वापरात नसलेल्या एका गोदामावर मुंबई व ठाणे दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) संयुक्तपणे कारवाई करून छापा टाकून सुमारे १५ किलो आरडीएक्सचा साठा दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच सदर घटनास्थळापासून तारापूर येथील अणूऊर्जा प्रकल्प नजिकच्या अंतरावर असल्याने शासनामार्फत सुरक्षेच्या दृष्टिने कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

दि. २७/१०/२०१६ रोजी दहशतवाद विरोधी पथक, मुंबई व खंडणी विरोधी पथक मुंबई यांच्या संयुक्त पथकाने केलेल्या कारवाईमधून प्राप्त झालेली स्फोटके रासायनिक विश्लेषक प्रयोगशाळेकडे तपासणीकरिता पाठविली आहेत. सदर प्रकरणी अज्ञात व्यक्ती विरुध्द गु.रजि.क्र. १०/२०१६ स्फोटक पदार्थाचा अधिनियम १९०८ चे कलम ४,५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास दहशतवाद विरोधी पथक, ठाणे करीत आहे.

स्फोटके मिळून आलेल्या घटनास्थळापासून आजूबाजूच्या परिसरातील गावांची माहिती घेतली आहे. तसेच जिल्हयातील स्फोटके वापरणारे तसेच स्फोटके पुरविणारे यांचेकडे दहशतवाद विरोधी पथक चौकशी करीत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाची शेड सुमारे ३५ वर्षापूर्वीपासून वापरात नसून याबाबत संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच राष्ट्रीय महामार्ग, यांचेकडे तसेच उड्डाणपूल, नदीवरील पूल बनविण्यासाठी ज्या कंपन्यांना ठेकेदारी दिली गेली होती त्यांचेकडे चौकशी करुन माहिती घेण्यात येत आहेत.

(३) तारापूर ॲटोमिक पॉवर सेंटर १ व २ हे “अ” वर्गवारीचे मर्मस्थळ असून केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली येथे केंद्रिय औद्योगिक सुरक्षा दलाचे एकूण ३७१ सुरक्षा अधिकारी व कर्मचारी पुरविण्यात आलेले आहेत. तारापूर येथील सुरक्षा रक्षकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील नागरिकांची रेली गेयर कंपनीने विम्याच्या नावाखाली केलेली आर्थिक फसवणूक

**(६) * ६७२८५ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर सायबर गुन्हे शाखेच्या पोलीसांनी अत्यल्प व्याजदराने कर्ज देण्याचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीला अटक केल्याचे दिनांक ३० जुलै, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर टोळीने पुणे शहरातील १२ लोकांसह देशभरातील ३५० नागरिकांची दिल्ली येथील रेली गेयर कंपनीच्या विम्याच्या नावाखाली पावणे नऊ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन फसवणूक करणाऱ्या रेली गेयर कंपनीच्या टोळीवर कडक कारवाई करुन गुंतवणूकदारांचे पैसे परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर टोळीने पुण्यातील ४ लोकांची रु.५.३५ लाखांची फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या टोळीतील एक आरोपी रेली गेयर कंपनीचा एजंट असून तो कंपनीचे नावे लोन देण्यासंदर्भात पैसे घेऊन रेली गेयर कंपनीची पॉलीसी देत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या फसवणूकीत रेली गेअर या कंपनीचा सहभाग असल्याचे आढळून आले नाही.

(३) सदर प्रकरणी ३ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचे विरुध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, शिवाजीनगर कोर्ट, पुणे येथे दोषारोपपत्र पाठविण्यात आले असून सदरचा खटला न्याय प्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उल्हासनगर (जि.ठाणे) मधील वडोल गाव येथील पादचारी पुलाबाबत**

**(७) * ६९६०५ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) मधील वडोल गाव या ठिकाणी ३० ते ३२ वर्षीपूर्वी वालधुनी नदीवर उभारलेला पादचारी पूल कोसळल्याने व पर्यायी व्यवस्था नसल्याने कोसळलेल्या पुलावरुनच आपला जीव धोक्यात घालून परिसरातील नागरीक, शालेय विद्यार्थी ये-जा करीत असूनही महापालिकेने अद्यापपर्यंत या पुलाचे बांधकाम सुरु केले नसल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वडोल गाव या ठिकाणी असलेला पादचारी पुल दिनांक २१.०९.२०१६ रोजी कोसळला हे खरे आहे.

- पादचाऱ्यांनी या पुलाचा वापर ये-जा करण्यासाठी करु नये म्हणून सदर पुलाच्या दोन्ही बाजूस बांबूचे बॅरिकेड्स लावण्यात आले होते.
- सदर पुलाचा वापर करु नये याबाबत विद्यार्थी / विद्यार्थीनी, शिक्षकवर्ग, कर्मचारीवर्ग व पालकवर्ग यांना आपल्या स्तरावर सूचना देण्यात याव्यात असे संबंधित शाळेस दिनांक ०७.१०.२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
- सदर पुल धोकादायक असल्याबाबतचा फलक त्याठिकाणी लावण्यात आला आहे.

तथापि, बांबुचे बॅरिकेड्स पादचाऱ्यांकडून काढून टाकण्यात आले आहेत व सदर पुलाचा वापर करण्यात येतो ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत सदर पुलाच्या बांधकामाकरिता मे. ए. एम. रामचंदानी यांना दिनांक १३.१०.२०१६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

सदर पादचारी पुलाचा प्लेन टेबल सर्वे व सेंटरलाईनचे काम पूर्ण झाले आहे. तथापि, वडोल गावास पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या सदर पुलाच्या खांबांना टेकून असल्यामुळे सदर जलवाहिन्या सुरक्षितरित्या स्थलांतरीत करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

सदर जलवाहिन्यांच्या स्थलांतरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर पुलाच्या स्थापत्य स्वरुपाच्या कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

-----------------

## मुंबई येथील जेष्ठ माहिती अधिकार कार्यकर्ते श्री. भुपेंद्र विरजी वीरा यांची अज्ञात मारेकऱ्यांनी हत्या केल्याबाबत

**(८) * ६५२४६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील जेष्ठ माहिती अधिकार कार्यकर्ते श्री. भुपेंद्र विरजी वीरा यांची दिनांक १५ ऑक्टोंबर, २०१६ च्या रात्री घरात घुसून अज्ञात मारेकऱ्यांनी गोळया झाडून हत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. भुपेंद्र वीरा यांना १० दिवसांपूर्वी त्यांच्या राहत्या घरासमोरील रस्त्यावर ८ ते १० अनोळखी व्यक्तींनी अडवून जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी वाकोला पोलिसांत त्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी लेखी तक्रार दिली असूनही वाकोला पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करुन कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच यापुर्वी राज्यात पुणे, औरंगाबाद व इतर ठिकाणी माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या अज्ञात मारेकऱ्यांकडून हत्या करण्यात आल्या असून अद्यापही सदर मारेकऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

८ ते १० दिवसापूर्वी असा प्रकार घडल्याबाबत त्यांनी किंवा त्यांच्या कुंटुंबियांकडून कोणत्याही प्रकारची तक्रार वाकोला पोलीस ठाणे येथे प्राप्त झालेली नाही. त्यामुळे त्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले हे खरे नाही.
(३) पुणे ग्रामीण जिल्हा कार्यक्षेत्रात सन २०१० सालामध्ये सतिश शेट्टी या माहिती अधिकार कार्यकर्त्याचा खून झालेला असून याबाबत तळेगाव दाभाडे पोलिस स्टेशन येथे गु.र.क्र ०८/२०१० भा.दं.वि. कलम ३०२, १२० (ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास सी.बी.आय. कडे वर्ग करण्यात आलेला आहे.

औरंगाबाद जिल्ह्यात याबाबत कुठलाही गुन्हा दाखल नाही.
(४) वाकोला पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ४७३/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, ३४ सह कलम ३, २७ भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून २ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. त्यानंतर सदरचा गुन्हा गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-८ येथे तपासकामी वर्ग करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथील पोलीस वसाहतींच्या दुरावस्थेबाबत

**(९) * ६६०६८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना

राहण्यासाठी बांधण्यात आलेल्या पाच दुमजली इमारतींची अत्यंत दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस वसाहतीमधील ५ इमारतींची सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वर्षानुवर्षे डागडुजी करण्यात आली नसल्यामुळे तसेच सांडपाण्याची योग्य व्यवस्था होत नसल्याने सांडपाण्याच्या दुर्गंधीमुळे रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून उक्त धोकादायक व जीर्ण अवस्थेतील इमारतीत पोलीसांच्या कुटुंबियांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी नवीन इमारती बांधण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) या पोलीस वसाहतीमधील शासकीय निवासस्थानांची दुरुस्ती करण्यासाठी सन २०१३-१४ मध्ये रु. ८१.६२ लक्ष इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करुन देण्यात आला होता. तथापि, प्रस्तुत कामाची निविदा निश्चिती न झाल्यामुळे सदरच्या कामावर खर्च करणे शक्य झाले नाही. सन २०११-१२ व सन २०१३-१४ मध्ये पोलीस वसाहतींच्या दुरुस्तीसाठी वितरित करण्यात आलेला निधी माणगांव, मुरुड व कळंबोली येथील पोलीस वसाहतींच्या कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खर्च करण्यात आला आहे.

अलिबाग येथील पोलीस वसाहतीच्या दुरुस्तीसाठी वितरित करण्यात आलेला निधी अन्य वसाहतींच्या कामांसाठी खर्च का करण्यात आला याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून चौकशी करण्यात येईल.

(३) व (४) अलिबाग, जि.रायगड येथे ३८४ निवासस्थाने बांधण्याबाबत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मालवणी, मालाड (प) मुंबई येथील शासकीय जागेवर भूमाफियांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(१०) * ६६७९४ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवणी, मालाड (प) मुंबई येथील सिटी सर्वे क्र. २२१, सीटीएस क्र.२९२० अलीतलाव येथील दौलत शाळेमागे गेल्या ३० ते ४० वर्षापासून जिल्हाधिकारी अंतर्गत असलेल्या मोकळया शासकीय भूखंडावर भूमाफिया रमा तिवारी, विनोद तिवारी आणि त्यांचे इतर सहकारी यांनी ३०० ते ४०० निवासी आणि अनिवासी घरे बांधली असून त्या जागेवर प्लान्टींग करून लाखो रूपयांना येथील जागा विकण्यात आल्याप्रकरणी शीव पूजन सिंह यांनी उपनगर जिल्हाधिकारी, तहसिलदार, महापालिका, मालवणी पोलीस ठाणे आदीकडे माहे ऑगस्ट २०१६ मध्ये वा त्यादरम्यान व मागील १ वर्षापासून सातत्याने लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधितांकडे लेखी तक्रारी करुनही अदयाप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने शासकिय भुखंडावर भुमाफियांनी अतिक्रमण करुन बांधलेली निवासी व अनिवासी घरांचे निष्कासन करुन भुमाफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) पश्चिम उपनगरातील मालाड ( प ) मुंबई येथील सिटी सर्वे क्र.२२१, सीटीएस क्र. २९२० येथे झोपड्या बनवून विकत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रारी केल्या हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) उपरोक्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने नगर भूमापन अधिका-यांनी चौकशी केली असता उक्त जागेवर अतिक्रमण असल्याचे निदर्शनास आल्यामुळे दिनांक १९.११.२०१६ रोजी कच्च्या व पक्क्या स्वरूपाच्या ११३ निवासी / अनिवासी झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले आहे.

-----------------

**अंबरनाथ (जि. ठाणे) येथील गार्डीयन दंत महाविद्‌यालयाच्या इमारतीच्या अनाधिकृत बांधकामाबाबत**

**(११) * ६८९९४ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील गार्डीयन दंत महाविद्‌यालयाच्या इमारतीचे बांधकाम अनधिकृतरित्या करण्यात आले असून सदर बांधकाम अनधिकृत असल्याचे अंबरनाथ नगरपरिषद प्रशासन व उच्च न्यायालयाने जाहीर करुनसुध्दा या बेकायदेशीर बांधकामावर अंबरनाथ नगरपरिषदेकडून कोणतीच कारवाई होत नसल्याने दिनांक ५ ऑक्टोंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे सविस्तर पुराव्यांसह लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकाम अवैध कागदपत्रांच्या सहाय्याने व नगरपरिषद प्रशासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन तसेच मान्य एफएसआय पेक्षा अधिक केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अवैध बांधकाम अंबरनाथ नगरपरिषद प्रशासनाने निष्कासीत न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त तक्रारीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंबरनाथ नगरपरिषदेने दि. ११/०८/२०१६ रोजीच्या आदेशान्वये गार्डियन दंत महाविद्‌यालयाच्या इमारतीचे बांधकाम अनाधिकृत म्हणून घोषित केले आहे.

यानुसार दिनांक ०८/०९/२०१६ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना नियम १९६६ नुसार नोटिस देऊन कारवाई सुरु केली आहे.

(३) या प्रकरणी गार्डियन दंत महाविद्‌यालयाने मा. उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका दाखल केली यानुसार मा. उच्च न्यायालयाने अंतरिम आदेशान्वये कार्यवाहीस स्थगिती दिली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**धांदरफळ बुद्रुक (ता. संगमनेर, जि. अहमदनगर) परिसरात प्रवरा नदी पात्रातून वाळूची वाहतूक करणाऱ्या वाळू तस्करांनी पोलीसांवर हल्ला केल्याबाबत**

**(१२) * ६६२३१ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धांदरफळ बुद्रुक (ता. संगमनेर, जि.अहमदनगर) परिसरात प्रवरा नदी पात्रातून विना परवाना वाळूची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकास पकडून नेणाऱ्या पोलीस कर्मचारी पथकावर ९ वाळू तस्करांनी हल्ला करुन त्यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या घटनेत तीन जण जखमी झाल्याचे दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, या हल्ल्यात एक पोलीस कर्मचारी जखमी झाला आहे.

(२) सदर प्रकरणी संगमनेर तालुका पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. १३८/२०१६ भा.द.वि. कलम ३०७, ३७९, ३५३, १४३, १४४, १४७, १४८, १४९, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात ९ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सर्व अटक आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. उर्वरित ३ आरोपीपैकी २ आरोपी फरार असून एक आरोपी सी.आर.पी.एफ. दलामध्ये शिपाई आहे. सध्या तो जम्मु येथे कर्तव्यावर असल्याने त्याचे युनिटला पत्र पाठवून आरोपीस हजर होण्याची समज देण्यात आली आहे. सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई, नालासोपारा, तुळींज, विरार, माणिकपूर आणि अर्नाळा (जि. पालघर) परिसरातून ५६० मुले बेपत्ता झाल्याबाबत**

**(१३) * ६७९४८ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वसई, नालासोपारा, तुळींज, विरार, माणिकपूर आणि अर्नाळा परिसरातून माहे जानेवारी २०१५ ते ऑगस्ट, २०१६ या वीस महिन्यांच्या कालावधीत ५६० अल्पवयीन मुले बेपत्ता झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार किती अल्पवयीन बेपत्ता झालेल्या मुलांचा शोध घेण्यात आला आहे तसेच मुले बेपत्ता होण्याच्या घटनांना रोखण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) जानेवारी, २०१५ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत पालघर जिलहयातून एकूण ५९३ मुले बेपत्ता झालेली होती. यापैकी ५३७ मुलांचा शोध लागलेला आहे.

या घटनांना आळा बसण्यासाठी गृहनिर्माण सोसायटी मध्ये भेट देऊन जनजागृती केली जाते. तसेच जिल्हयात अनैतिक मानवी प्रतिबंधक कक्ष स्थापित असून मुस्कान अभियान राबवून बेपत्ता व्यक्तिंचा शोध घेण्यात येतो. मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन (सिव्हील) क्र.७५/२०१२ मध्ये दिलेल्या सुधारित कार्यप्रणाली व पोलीस महासंचालक, मुंबई यांचेकडील स्थायी आदेशान्वये मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे मुलांचा शोध घेण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील एम्प्रेस मॉलच्या अवैध बांधकामाची चौकशी करण्याबाबत**

**(१४) * ७१०५९ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील एम्प्रेस मॉलच्या बांधकामासंदर्भात मे.के.एस.इंडस्ट्रीज लि. यांनी भुखंड क्र. १ व २ मध्ये ३०२५२.७२ चौ.मी., भुखंड क्र. ३ व ४ मध्ये १३८२१.७२ चौ.मी., भुखंड क्र. ५ मध्ये २५१६७.६२ चौ.मी., ॲमेनिटी स्पेस मध्ये ४७९२.८४ चौ.मी., खुली जागा मध्ये १४३७८.५८ चौ.मी., या जागांवरील अभिन्यासाच्या नकाशा मंजूरीसाठी बांधकामाच्या नकाशात वारंवार बदल करुन सन २००४, २००७ व २०१३ मध्ये प्रस्ताव सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास महानगरपालिकेनी मंजूरी दिल्यानंतर विकासकांनी त्यात बदल करुन पुन्हा सादर केलेला प्रस्तावास २००५ व २००९ मध्ये मंजूरी देण्यात आली, परंतू महानगरपालिकेनी दिलेली मंजूरी व शासन निर्णयाचे उल्लंघन करुन मोठया प्रमाणात मंजूरीपेक्षा अवैध व अतिरिक्त बांधकाम करण्यात आले असल्याची बाब दिनांक २ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या दिनांक २० जुलै, २००७ च्या निर्णयातील नमूद अटीनुसार अभिन्यासाचे क्षेत्रफळ ५ हेक्टरपेक्षा अधिक असल्यास अभिन्यासात २५ टक्के जागा सुविधा क्षेत्रासाठी सोडणे आवश्यक आहे, परंतू एम्प्रेस मॉल येथे संपुर्ण भुखंडावरच इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून २८९८६.७६९ चौरस मीटर क्षेत्रात अवैध बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच एम्प्रेस मॉल येथे पार्कीगच्या नावाखाली जास्त शुल्क आकारुन नागरिकांची फसवणूक करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) भागश: खरे आहे. वर्ष २००५, २००९ व २०१३ मध्ये अर्जदार यांनी बांधकाम परवानगी व सुधारीत परवानगी प्रस्ताव नागपूर महानगरपालिकेकडे सादर केलेला आहे.

(२) अनधिकृत बांधकामाची बाब महानगरपालिकेच्या झोन कार्यालयास दि.०२.११.२०१६ पूर्वीच निदर्शनास आलेली आहे.

(३) विकासकाने विनापरवानगी २८९५८.७६९ चौ.मी. बांधकाम केलेले आहे.

(४) याबाबतची तक्रार नागपूर महानगरपालिकेस किंवा शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) मे. के.एस. ॲण्ड इंन्डस्ट्रीज लिमी. यांना अनधिकृत बांधकाम न काढल्यामूळे रु.९,६०,०३,४९६/- इतकी रक्कम शास्ती म्हणून महानगरपालिकेच्या कार्यालयात जमा करणेबाबत नोटीस दिली आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमाचे कलम ५३ अन्वये अनधिकृत बांधकाम निर्मूलनाची अंशत: कारवाई केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बेहरामपाडा, बांद्रे (पू) मुंबई येथील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत**

**(१५) * ७१२९८ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) मुंबई येथील बेहरामपाड्यात दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास अनधिकृत बांधलेली चार मजली झोपडीवजा इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ६ जण ठार आणि ५ जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषी असणाऱ्यांवर तसेच तेथे अनधिकृत झोपड्या उभ्या करु देणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, भविष्यात अशा दुर्घटना घडू नयेत म्हणून शासनामार्फत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) बेहरामपाडा, वांद्रे (पूर्व) ही जागा रेल्वे प्राधिकरणाच्या अखत्यारीत असल्याने तेथील अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही करण्याची जबाबदारी ही रेल्वे प्राधिकरणाची आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी अनधिकृत बांधकामासंदर्भात आवश्यक कारवाई कालबध्दरित्या करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत रेल्वे प्राधिकरणास दुर्घटनेपूर्वी दिनांक २१.०७.२०१६ रोजी कळविण्यात आले आहे.

(३) व (४) बेहरामपाडा, वांद्रे (पूर्व) येथील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी पश्चिम रेल्वे प्रशासनाने आगाऊ मागणी केल्यास त्यासाठी लागणारे मनुष्यबळ व यंत्र सामुग्री महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येते.

सदर ठिकाणी अनधिकृत/धोकादायक झोपडे/बांधकाम कोसळून जीवितहानी व वित्त हानी होऊ नये यासाठी महानगरपालिका व रेल्वे प्रशासनामार्फत १४ फुटांपेक्षा अधिक उंचीच्या झोपड्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात येत असून आतापर्यंत १९ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.

तसेच, महानगरपालिकेमार्फत बेहरामपाडा येथील ५५ बांधकामांच्या मालक/रहिवाशांना खबरदारीची सूचनापत्रे बजावण्यात आली आहेत.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील विरार-बोळींज येथे गृह प्रकल्पांची योजना आखून विकासकाने ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत

**(१६) * ६९२४९ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेसर्स आयोनिक (इकोसिटी) रियल्टी प्रा.लि आणि मेसर्स क्रिस्टल होत कॉन प्रा.लि.या दोन कंपन्यांनी ठाणे जिल्ह्यातील विरार-बोळींज येथे गृह प्रकल्पांची योजना आखून धनादेश व रोख रकमेद्वारा ग्राहकांकडून सुमारे ६० ते ७० कोटी रुपये घेऊन फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासकाला पोलिसांनी दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मुंबईत अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच ग्राहकांचे रक्कम परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदरहू गृहप्रकल्पप्रकरणी गुंतवणूकदारांच्या ठेवींचा अपहार करुन फसवणूक केल्याबाबत अर्नाळा सागरी पोलीस स्टेशन गु.र.क्र. I १५८ / २०१६, कलम ४०६,४०९,४६७,४६८,४७१,४२०,३४ सह १२० (ब) भादंविस सह कलम १३ व १४ मोफा कायदा - १९६३ सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय आस्थापनांमधील) हितरक्षण कायदा सन १९९९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेरळ माथेरान (जि. रायगड) रस्त्यावर खड्डे पडल्याने वाहनचालक तसेच पर्यटकांना होणारा त्रास

**(१७) * ६९८८९ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नेरळ हुतात्मा चौक ते माथेरान दस्तूरी नाका या रस्त्याच्या कामासाठी २७ कोटी रुपये निधी दिला असून वन विभागाने सदर रस्त्याच्या कामापैकी ७ कि.मी. रस्ता वन विभागामधून जात असल्याने काम करण्यास परवानगी दिलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच नेरळ माथेरान (जि. रायगड) रस्त्यावर मोठया प्रमाणावर खड्डे पडले असल्याने वाहनचालकांना तसेच पर्यटनासाठी येणाऱ्या जनतेला याचा त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्ता तात्काळ दुरुस्त करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, रायगड यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत व ७ कि.मी. रस्त्यासाठी वन विभागाची परवानगी घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नेरळ हुतात्मा चौक ते माथेरान दस्तुरी नाका हा ६.७० कि.मी. लांबीचा रस्ता ७ मी. रुंदी मध्ये सुधारणा करण्यास वनखात्याने परवानगी दिली आहे.
(२), (३), (४), (५) व (६) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दिनांक १२/११/२०१६ रोजी वनविभागास ई प्रणालीद्वारे १+१ मार्गिका रस्ता पूर्ण विकसित करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वनजमिनीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, सदर रस्ता दुरुस्त करण्याची मागणी सप्टेंबर, २०१६ मध्ये केली आहे, हे खरे आहे. यानुषंगाने जुमापट्टी व दस्तुरी दरम्यानच्या खराब रस्त्याची तात्पुरत्या स्वरुपाची डागडुजी प्राधिकरणाकडून करण्यात आलेली असून रस्ता वाहतुक योग्य करण्यात आलेला आहे. वनविभागाची सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर सदर रस्त्याची सुधारणा वाहतुक सुरक्षा उपाययोजनांसह एकसंघपणे त्वरेने पूर्ण करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित आहे.

-----------------

## पवई (मुंबई) येथील हिरानंदानी हॉस्पिटलमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे सुरु असलेले किडनी प्रत्यारोपण

**(१८) * ६५०६५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राहुल बोंद्रे (चिखली),**

**डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवई (मुंबई) येथील हिरानंदानी रुग्णालयात बनावट कागदपत्रांच्या आधारे आर्थिक व्यवहारातून होत असलेल्या किडनी प्रत्यारोपण प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिका-यासह पाच डॉक्टरांचा सहभाग असल्याचे आढळून आले असून त्यांना अटक करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची तसेच यापूर्वी केलेल्या किडनी प्रत्यारोपण प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच राज्यात किडनी तस्करीच्या घटना घडू नये याकरिता शासनातर्फे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

हिरानंदानी हॉस्पीटलच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यासह पाच डॉक्टरांना दि.९.०८.२०१६ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

(२) होय.

उपरोक्त प्रकरणाची मा. संचालक तथा सामुचित अधिकारी, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन मुंबई यांनी चौकशी केलेली आहे. तसेच हिरानंदानी हॉस्पीटल येथे यापुर्वी केलेल्या ०२ किडणी प्रत्यारोपण प्रकरणाबाबत अहवाल मा.संचालक तथा सामुचित अधिकारी, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आलेला असून सदर प्रकरणाची चौकशी त्यांच्याकडे चालू आहे.

(३) सदर प्रकरणी पवई पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ३५५/२०१६ कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) भा.द.वि.सं. सह कलम १९ मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम १९९४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. संचालक तथा सामुचित अधिकारी, आरोग्य सेवा, मुंबई यांचे कडील चौकशी समितीने दिलेल्या अभिप्रयानुसार सदर गुन्हयात कलम १२, २० व २१ मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम १९९४ अन्वये हि वाढीव कलमे लावण्यात आलेले आहेत.

या प्रकरणातील एकूण १८ आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. तसेच, अद्याप पर्यंत एकूण १५ आरोपींना अटक करण्यात आले असून ३ पाहीजे आरोपींना अटक करणे बाकी आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाड, बिरवाडी, गोरेगांव, अलिबाग (जि. रायगड) तसेच पुणे व इतर जिल्हयातील १२ हजार गुंतवणूकदारांची ऑस्कर सर्व्हिसेस लि. कंपनीने केलेली फसवणूक**

**(१९) * ६६७३२ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील महाड, बिरवाडी, गोरेगांव, अलिबाग तसेच पुणे व इतर जिल्हयातील तब्बल १२ हजार गुंतवणूकदारांची ऑस्कर सर्व्हिसेस लि. या गुंतवणूक कंपनीने १५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनीविरोधात कारवाई करण्याबाबत तसेच गुंतवणूक केलेली रक्कम परत मिळविण्याबाबतची मागणी महाड येथील गुंतवणूकदारानी प्रांत कार्यालयावर २२ ऑगस्ट, २०१६ रोजी मोर्चा काढून केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

रायगड जिलह्यातील महाड, बिरवाडी, गोरेगाव कार्यालयातून तब्बल ८९२९ गुंतवणूकदारांकडून ऑस्कर सर्व्हिसेस लि. कंपनीने रु.८,६७,११,१५८/- चाईल्ड कलेक्शन, फिक्स डिपॉझिट व आरडी कलेक्शन या स्वरुपात जमा करुन त्याची फसवणूक केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे. या व्यतिरिक्त राज्यातील अन्य जिल्हयात कोठेही ऑस्कर सर्व्हिसेस लि. या कंपनीने गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत तक्रारी वा गुन्हे दाखल नाहीत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी ऑस्कर कंपनीविरुध्द महाड शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१२/२०१६ भांदवि कलम ४२०, ४०९, ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हित संरक्षण कायदा १९९९ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचे कामी दोन आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील जिल्हा परिषद मैदानावर फटाक्यांच्या स्टॉलला आग लागल्याबाबत

**(२०) * ७१४०५ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील जिल्हा परिषद मैदानावरील फटाक्यांच्या दुकानांना लागलेल्या आगीमध्ये १४० दुकाने, ८७ दुचाकी, २० कार, छोटा टेम्पो जळून सुमारे १३ रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हा परिषद मैदानामध्ये अग्निशमन दलांच्या गाडया उपस्थित नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भीषण आगीची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली तसेच नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३)

- महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे औरंगाबाद शहर फायर वर्क्स डिलर्स असोसिएशनचे पदाधिकारी व संभाजीनगर फटाका असोसिएशनचे कोषाध्यक्ष व इतर पदाधिकारी यांच्या विरोधात FIR क्र. १११५, दि.०५.११.२०१६ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे.
- सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी चार सदस्यीय समिती गठित करण्यात आली असून त्यामध्ये मुख्य लेखा परिक्षक, दोन उपआयुक्त व एक उपअभियंता यांचा समावेश करण्यात आलेला आहे.
- या प्रकरणी प्रथमदर्शनी दोषी आढळल्याने महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिकारी, यांना दि.२९.१०.२०१६ च्या कार्यालयीन आदेशानूसार निलंबित केले आहे.
- चौकशी समितीची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून अहवाल प्राप्त होताच निष्कर्षानुसार सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने नुकसान भरपाईबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काशिमिरा आणि मीरा रोड (जि. ठाणे) परिसरातील बनावट कॉल सेंटरवर करण्यात आलेली कारवाई

**(२१) * ६५२७९ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील काशिमिरा आणि मीरा रोड येथील बनावट कॉलसेंटर मधून अमेरिकन नागरीकांना टॅक्स डिफॉल्टर असल्याची धमकी देऊन ३०० ते

५०० कोटीं रुपयांची लूट करणाऱ्या सेंटरवर ठाणे पोलीसांनी कारवाई करुन ८५१ हार्ड डिस्क, हायस्पीड सर्व्हर, डी.व्ही.आर, लॅपटॉप असा १ कोटीचा मुद्देमाल जप्त केल्याचे तसेच ७७२ जणांना ताब्यात घेऊन ७० जणांना दिनांक ४ ऑक्टोबर २०१६ रोजी वा त्या सुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरहू प्रकरणी खालील प्रमाणे ३ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

१)काशिमीरा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५९६/२०१६, भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, ३८४, १२० (ब), ४६८, ४७०, ४७१, २०१ सह इंडीयन टेलीग्राफ ॲक्टचे कलम २५ (क), तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ चे कलम ६६ (क), ६६(ड), ७२, ७५

२)नयानगर पोलीस ठाणे मध्ये (१) ३३४/२०१६ भा.दं.वि.कलम ४१९, ४२०, ३८४, ३४, १२०(ब) सह माहिती तंत्रज्ञान का.क. ६६(ब), ६६(क), ७२(१), ७५ प्रमाणे व (२) ३३५/२०१६ भा.द.वि.कलम ४१९, ४२०, ३८४, ४६८, ४७०, ४७१, १२०(ब) सह माहिती तंत्रज्ञान ६६(क), ६६(ड), ७२, ७५ व सह इंडीयन टेलीग्राफ ॲक्टचे कलम २५(अ) प्रमाणे आहे.

वरील गुन्हयांमध्ये घटनास्थळी ७२ व अद्यापपर्यंत एकूण ८० आरोपींना अटक करण्यात आली असून कॉल सेंटरमध्ये काम करणारे एकुण ५२२ व्यक्तींना तपासाकामी हजर राहण्याबाबत समज देऊन सोडून देण्यात आलेले आहे. तसेच कॉल सेंटर चालविण्यासाठी वापरण्यात आलेल्या संगणकामधील हार्ड डिस्क, सर्वर, मॅजिक जॅक, डीव्हीआर, मोबाईल फोन, वेगवेगळी इलेक्टॉनीकस तांत्रीक उपकरणे, इतर साधनसामुग्री, कागदपत्रे जप्त करण्यात आलेली आहेत व प्रस्तुतचे प्रकरण तपासाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विक्रोळी (प.) मुंबई सिद्धार्थ नगर येथील झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२२) * ७०८५२ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पूर्व उपनगरातील विक्रोळी (प.) सिद्धार्थ नगर येथील झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी एसआरए प्रकल्प राबविणाऱ्या विकासकाने विक्री घटकाच्या इमारतीसाठी मंजूर आराखडा व भोगवटा प्रमाणपत्रामध्ये ज्या अटी व शर्ती होत्या त्यांचे उल्लंघन करुन मशीनद्वारे डोंगर फोडून अनधिकृत खोदकाम केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंगर फोडून अनधिकृत खोदकाम केल्यामुळे डोंगर खचून डोंगरावर राहत असलेल्या हजारो झोपडीधारकांच्या जिविताला धोका निर्माण झाला असून याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.गृहनिर्माण मंत्री व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकावर मंजूर आराखड्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) विक्रोळी पार्कसाईट रस्त्याच्या दक्षिण बाजूस लागून मौजे घाटकोपर येथील न.भू.क्र. १/९ ए, १/१० (पै). १/११ (पै) वर सिध्दार्थ नगर एस.आर.ए. योजना राबविण्यात आली होती. सदर इमारतीस सन २००९ रोजी पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले असून सर्व पात्र झोपडीधारकांना पुनर्वसन सदनिकांचा ताबा देण्यात आला आहे.

सदर भूखंडास लागून असलेल्या व एस.आर.ए. योजनेच्या हद्दीबाहेरील भूखंड क्रमांक १/९ ए वरील प्रस्तावित इमारतीस महानगरपालिकेमार्फत दिनांक २८.०३.२००८ रोजी अमान्यतेची सूचना (आय.ओ.डी) व दिनांक २९.०३.२००८ रोजी जोत्यापर्यंतचे प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

तसेच, सदर ठिकाणी जिल्हाधिकारी (मुंबई उपनगरे) यांच्या परवानगीने खोदकाम करण्यात आले असून आतापर्यंत ३०,८०० ब्रास इतके उत्खनन करण्यात आले आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन देण्यात आले आहे ही वस्तुस्थिती आहे.
(३) व (४) सदर ठिकाणी जिल्हाधिकारी (मुंबई उपनगरे) यांच्या परवानगीने खोदकाम सुरु करण्यात आले होते.

सदर बाबतीत मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रमांक ६३/२०१६ दाखल करण्यात आली.

सदर प्रकरणी मा. न्यायालयाने दिनांक १८.०७.२०१६ रोजी "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले आहेत. सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आलेली नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिकेमध्ये टीडीआर गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२३) * ७०१५५ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेमध्ये धनकवडी येथील सर्वे नं. ४/१७/२ या मिळकती मधील १० गुंठे जागेवर रस्त्याचे आरक्षण असताना ही जागा मूळ मालकाने विकासकास विकल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित विकासकाने महापालिकेतील अधिका-यांशी संगनमत करुन टीडीआर घेतला होता परंतु गैरव्यवहाराच्या माध्यमातून टीडीआर देण्यात आला असल्याच्या तक्रारी आल्यानंतर महापालिकेने ६ वर्षापूर्वी देण्यात आलेला टीडीआर रद्द केला असुन सदर भूखंडाची मालकी कोणाकडे आहे हे अद्यापही निश्चित नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त टीडीआर गैरव्यवहार प्रकरणात सहभागी असलेल्या काही व्यक्ती, महापालिकेचे तत्कालीन आयुक्त, बांधकाम तसेच विधी विभागातील संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही, ७/१२ उताऱ्यानुसार मालक श्री. सुभाष पानसरे व इतर यांची नोंद आहे. महानगरपालिकेकडील पंजीकृत विकासकांचे यादीमध्ये त्यांचा समावेश नाही.

(२) विषयांकित मिळकतीमध्ये सन १९८७ चे विकास योजना आराखड्यामध्ये ६० फूट (१८ मी.) विकास योजना रस्ता दर्शविलेला आहे. सदर रस्त्याखालील क्षेत्राचा टिडीआर मिळणेसाठी दाखल प्रस्तावातील ७/१२ उता-यावर मालक श्री. सुभाष पानसरे, श्री. सुभाष जगताप व सौ. सविता गावडे यांना डी. आर. सी. नं. ३९०८ क्षेत्र ३४१.५१ चौ. मी. दि.२५/०६/२०१० रोजी अदा करण्यात आलेले आहे.त्याप्रमाणे ७/१२ उता-यावर नोंद झाली आहे.

इतर हक्कातील धारक श्री. थोरवे यांनी प्रकरणी तक्रार केलेली असून सदर तक्रारीमध्ये विषयांकित मिळकतीतील डी. आर. सी. नं.३९०८ रद्द करणेची मागणी केली आहे तसेच डीआरसी धारक श्री. सुभाष पानसरे, श्री. सुभाष जगताप व सौ. सविता गावडे यांनी पत्र दि. ०५/०७/२०१६ अन्वये सदर मिळकती संदर्भात घेतलेल्या ३४१.५१ चौ.मी. चा टिडीआर परत देत आहोत व ७/१२ उताऱ्यावरील महानगरपालिकेच्या नावाची नोंद कमी करावी अशी महानगरपालिकेस विनंती केली आहे. या अनुषंगाने संबंधितांना दि.१८/०८/२०१६ रोजीचे पत्रान्वये मुळ डीआरसी कार्यालयाकडे सादर करण्याबाबत कळविलेले होते. त्याप्रमाणे डीआरसी क्र.५०१३ मधून ३४५.५१ चौ.मी. क्षेत्र खर्ची करुन डीआरसी क्र.३९०८, वरील खर्चीची नोंद रद्द करण्यात आलेली आहे. तथापि पूर्वी डीआरसी दिल्याने ७/१२ उता-यावर अद्यापही महानगरपालिकेचे नाव आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे वाघिवली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील जमीन सिडकोने सावकार कंपनीला बेकायदा विक्री केल्याबाबत**

**(२४) * ६५९०६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाघिवली (ता.पनवेल,जि.रायगड) येथील संपादित केलेल्या जमीनीच्या मोबदल्यात सिडकोने साडेबारा टक्के योजने अंतर्गत सिडको प्लॉट नं. ३, ४, व ४ - ए (सेक्टर नं. ३०/३१) मधील ५३ हजार चौ.मी. क्षेत्राची जमीन संरक्षित कुळाचे हक्क डावलून, मुंदरा नामक सावकार कंपनीला १५० एकर जमीन विक्री करुन ६६ संरक्षित कुळांची फसवणूक केल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १४ मार्च, २०१२ रोजीच्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मा.मुख्यमंत्री, नगर विकास यांचेकडे दाखल केलेली याचिका, मा. महसूल मंत्री यांचेकडे वर्ग करण्यात येवूनही अद्याप या याचिकावर शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने, चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जमिनी संरक्षित कुळांना परत करण्याबाबत तसेच दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित सिडको व महसूल अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मौजे वाघिवली, जि.रायगड येथील मूळ जमीनधारक श्री.जुगलबक्ष हनुमानबक्ष मुंदरा व इतर यांच्या संपादित करण्यात आलेल्या जमिनीपोटी त्यांची साडेबारा टक्के योजनेअंतर्गत पात्रता मंजूर करण्यात आली होती. त्यामुळे बेलापूर नोडमधील सेक्टर क्र.३०/३१ येथील टेकडी सदृश्य जागा जमिनधारक “जसे आहे तसे तत्वावर” घेण्यास तयार असल्याने सिडकोकडील लिंकेज समितीच्या मान्यतेने भूखंडवाटप केले आहे.

तसेच म.उच्च न्यायालय, मुंबई यांचे समोरील सिव्हिल ॲप्लिकेशन क्र.२८०/२०१२ मधील याचिकाकर्त्याचा अर्ज फेटाळताना मा.न्यायालयाने त्यांना प्रचलित कायद्यानुसार मार्ग अवलंबण्याचा पर्याय खुला ठेवल्याने याचिकाकर्त्याचा अर्ज महसूल व वन विभागास हस्तांतरीत करण्यात आला होता. तथापि, विचाराधीन जमिनीबाबत मा.मंत्री, महसूल यांनी दि.१.१०.२०१० च्या आदेशानुसार विनंती फेटाळली आहे. त्यामुळे सदर प्रकरणातील मिळकतीबाबत अर्जदार यांनी मुंबई कुळ वहिवाट व शेत जमीन कायदा, १९४८ मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडे दावा करणे आवश्यक आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील डिझीटल इंटरप्रायझेस कंपनीने गुंतवणुकदारांची फसवणूक केल्याबाबत

**(२५) * ७०११२ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात डिझीटल इंटरप्रायझेस कंपनी स्थापन करुन ऑनलाईन व्यवसायाची जाहिरात देऊन कंपनीने दिलेल्या बँकेच्या खात्यात एकुण १९ हजार ५०० रुपये भरल्यानंतर प्रत्येक सभासदाला प्रत्येक आठवड्याला रुपये २९२५ प्रमाणे २० आठवडे पैसे मिळतील असे आमिष दाखवून पुण्यातील ६० व देशातील सुमारे ५०० गुंतवणुकदारांना ११ कोटी रुपयांना फसविल्याबाबत सभासदांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पुण्यातील गुन्हे शाखेच्या सायबर सेलच्या पथकाने माहे ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीत गुन्हा नोंदविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण होवून संबंधीत दोषी व्यक्तींना अटक करण्यात आली आहे काय व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे शहरात डिझीटल इंटरप्रायझेस कंपनी स्थापुन व ऑनलाईन व्यवसायाची जाहिरात करुन त्याद्वारे गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे. यात पुण्यातील ३८ गुंतवणूकदारांना रु.९,३९,३३३/- ने फसविल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) सदर प्रकरणी दिनांक ०१.०९.२०१६ रोजी खबर देण्यात आली होती. त्यानंतर दि.१४.०९.२०१६ रोजी कोंढवा पोलीस स्टेशन येथे गुरनं ३८१/१६ नोंदविण्यात येऊन संबंधीत ५ आरोपींना पकडण्यात आले व त्यांचेकडून ३ मोबाईल, इतर कागदपत्रे व रोख रक्कम रु.२०,५८,५००/- हस्तगत करण्यात आली आहे. पुढील तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाकोला नाल्याची रुंदी कमी करुन तसेच मिठी नदीचा संरक्षित भागाचा बांधकामासाठी गैरवापर करण्यात आल्याबाबत

**(२६) * ७११९७ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकोला (मुंबई) येथील नाल्याची रुंदी कमी करुन तसेच मिठी नदीच्या संरक्षित भागाचा वापर करून झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबवित असलेल्या कनकिया पॅरिस या बांधकाम व्यावसायीकाने सागरी हद्द नियंत्रण कायद्याचा (सीआरझेड) उल्लंघन केल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृहसंकुल उभारताना विकासकाकडून वाकोला नाल्याची रुंदी कमी करण्यात आली आहे, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, दिनांक २६ जुलै, २००५ सारखी अतिवृष्टी झाल्यास वाकोला नाला व मिठी नदी परिसरातील वस्त्यांना धोका उदभवणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मौजे बांद्रा मुंबई येथील न.भू.क्र. ६२९ (पैकी) या भूखंडावरील महाराष्ट्र नगर, आंबेडकर नगर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंदर्भात मिठी नदीच्या सागरी हद्द नियंत्रण कायद्याचे उल्लंघन केल्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी योजनेतील विक्री घटकाच्या इमारतीस दि.११/८/२०१६ रोजी काम थांबविण्याची नोटीस बजावली आहे.

(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्राप्त अहवालानुसार वाकोला नाल्याची पूर्वीची रुंदी ४० मीटर वरुन ६० मीटर वाढविण्यात येवून एम.एम.आर.डी.ए मार्फत संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. तसेच सेवा रस्त्यासाठी १० मीटर जागेचे आरक्षण ठेवण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) वर नमूद मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नोटीसी विरुध्द विकासकाने मा.मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२२३७/२०१६ दाखल केली होती. या प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.२/९/२०१६ रोजी आदेश पारित करुन काम थांबविण्याबाबत जारी केलेली नोटीस ही कारणे दाखवा नोटीसी म्हणून गृहीत धरुन विकासकास सुनावणी देण्याबाबत निर्देश दिले आहेत, सदर प्रकरणी सुनावणी पूर्ण झाल्यावर गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे येथील मनिषा नगर (कळवा) येथे स.नं. १७ या शासकीय भुखंडावर अनधिकृतपणे वसलेल्या जानकी नगर वसाहतीबाबत**

**(२७) * ६९२५७ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवा (ठाणे) येथील मनिषा नगर येथील स.नं. १७ या शासकीय भुखंडावर गत १० वर्षापासून खाडीजवळ अनधिकृतपणे भराव टाकून जानकी नगर ही वसाहत तयार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जानकी नगरात बांधलेल्या बेकायदेशीर चाळीतील खोल्यांना ठाणे महापालिकेकडून पाणीपुरवठा, अधिकृत टॅक्स तसेच एम.एस.ई.बी. कडून वीज पुरवठाही जोडून दिला गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्वसामान्यांकडे अधिकृत कागदपत्रे असतांनाही वीज व पाणी पुरवठा देण्यास अक्षम्य विलंब लावणाऱ्या व बेकायदेशीर चाळींना वीज व पाणी पुरवठा करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच अनधिकृतपणे भराव टाकून बांधलेल्या बेकायदेशीर चाळी पाडण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे महानगरपालिकेच्या अभिलेखानुसार सन २००३ पासून सदर भुखंडावर कर आकारणी करण्यात आलेली आहे.
(२) होय.

महानगरपालिका अधिनियमातील कलम २६७ (अ) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेचे सर्व अधिकार अबाधित ठेवुन अनधिकृत बांधकामावर शास्तीसह कर आकारणी करण्यात आलेली आहे

(३) सदरहू जागेच्या सिमांकनाची कार्यवाही तात्काळ करुन त्यानुसार अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे व आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना सुचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भवानी सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता मे.अनिल कासले आणि कंपनी या विकासकाने उभारलेल्या प्रकल्पामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२८) * ६५९४६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भवानी सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता मे.अनिल कासले आणि कंपनी या विकासकाने निकमवाडी मस्जीद गल्ली, जी/नॉर्थ वार्ड अंतर्गत प्लॉट क्र. एफ.पी.क्र.५६९ (पीटी) ऑफ टीपीएस ४, माहिम डिव्हीजन या क्षेत्रावर उभारलेल्या प्रकल्पामध्ये अनेक गैरव्यवहार केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीतील संपूर्ण पार्किंग फ्लोअर तसेच ३ ते ७ मजले अनधिकृतरित्या बांधून त्यांचे रुपांतर व्यापारी गाळयांमध्ये केल्या प्रकरणी चौकशी करावी अशा आशयाच्या मागणीचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा (पूर्व) तसेच सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका जी/नॉर्थ वार्ड यांच्याकडे तेथील रहिवाशांनी तसेच लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जुलै, २०१५, दिनांक २७ जानेवारी, २०१६ व दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू तक्रारीनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१), (२) व (३) दादर (पश्चिम) अंतिम भूखंड क्र.५६९ (भाग) नगर रचना योजना-४ माहिम विभाग येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या ३१६६.५९ चौ.मी. इतक्या क्षेत्रावर भवानी सहकारी गृहनिर्माण संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना विकासक मे.अनिल कासले आणि कंपनी यांचेमार्फत राबविण्यात येत आहे.

सदर योजनेतील अनधिकृत बांधकामाबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे मा.लोकप्रतिनिधी यांची दि.२/७/२०१५, दि.२७/१/२०१६ व ४/२/२०१६ रोजीची निवेदने प्राप्त झाली होती. विकासकाने विक्री घटकाच्या इमारतीमध्ये ३ ते ६ मजल्यांवर व्यापारी/वाणिज्यिक गाळे बांधल्याचे निदर्शनास आल्यांनतर सदरचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याचे निर्देश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत विकासकास देण्यात आले होते. त्यानुसार विकासकाने सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित केल्याचे पत्र छायाचित्रांसह झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दिनांक २२/७/२०१५ रोजी सादर केले आहे. तसेच सदरचे अनधिकृत बांधकाम निष्कासित केल्याची खातरजमा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत स्थळपाहणी करुन करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुहागर, खेड व चिपळूण (जि.रत्नागिरी) खाडी भागातील गावांना जोडणाऱ्या रस्त्यांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२९) * ६५९१६ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे कोळवली (ता. गुहागर), मौजे चिवेली (ता. चिपळूण), मौजे तुंबाड, मौजे आयनी, मौजे आमशेत आणि मौजे होडखाड (ता. खेड) ही गावे खाडीकिनारी वसलेली असून कोळवली बंदरटोक ते जेटी, चिवेली बंदर, तुंबाड कदमवाडी ते बंदर, आयनी रेल्वे स्टेशन ते जेटी, आमशेत मोहल्ला ते जेटी, होडखाड भोईवाडी ते जेटी हे जोडरस्ते नसल्याने सदर भागातील रहिवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व जोड रस्त्यांसाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डामार्फत निधी उपलब्ध करून दयावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून वारंवार तसेच दिनांक १९ मे, २०१६ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) तुंबाड कदमवाडी भोईवाडी व आयनी ठाकरेवाडी रेल्वे स्टेशन येथे पोचरस्ता बांधण्याबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या स्वनिधीतून सन २०१६-१७ ह्या आर्थिक वर्षात हाती घेण्यात आले आहे. तसेच होडखाड (ता.खेड), येथे जोडरस्ता तयार करणे हे काम जिल्हा नियोजन समिती रत्नागिरी मार्फत सन २०१६-१७ मध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आमशेत मोहल्ला, कोळवली बंदर टोक चिवेली बंदर ह्या कामांची पाहणी करुन, आवश्यकता असल्यास सदरची कामे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत किंवा जिल्हा नियोजन समिती मार्फत काम सन २०१७-१८ ह्या आर्थिक वर्षात निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## वडणगे (जि.कोल्हापूर) येथील दीपक कॉलनीमधील प्लॉटची बेकायदेशीररित्या केलेली विक्री

**(३०) * ७१११११ श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडणगे (जि.कोल्हापूर) येथील दीपक कॉलनीतील गट कमांक ४५० मधील जमिनीच्या मुळ मालकाने नकाशात फेरफार करुन शासकीय अधिका-यांच्या संगनमताने कॉलनीतील सार्वजनिक खुल्या जागेतील सहा प्लॉटची बेकायदेशीररित्या विक्री केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन खुल्या जागेत सुरु असलेले बांधकाम थांबविण्यासाठी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा रहिवाशांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मौजे-वडगणे ता.करवीर जि.कोल्हापूर येथील दीपक कॉलनीतील गट नं.४५० मधील जमिनीच्या मुळ मालकाने रेखांकनातील खुल्या जागेत ४ भूखंडांची बेकायदेशिररित्या विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी मंडळ अधिकारी, निगवे दु. यांचेमार्फत केलेल्या चौकशीमध्ये सहाय्यक संचालक, नगररचना यांनी मंजूर केलेल्या रेखांकनातील रस्ते व खुली जागा यामध्ये मूळ मालकांनी कोणतीही परवानगी न घेता भूखंड पाडून विक्री केल्याचे आढळले व अशा विक्री केलेल्या भूखंडांच्या नोंदी गा.न.नं. ७/१२ मध्ये दाखल करण्यात आलेल्या आहेत. अशा सदोष फेरफार नोंदी पुनरीक्षणामध्ये घेऊन नियमानुसार रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर पुनरीक्षणाच्या प्रक्रियेत संबधीत मंडल अधिकारी व तलाठी दोषी आढळल्यास त्यांचेवर नियमानुसार उचित कारवाई करण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर.के.कन्स्ट्रो प्रोजेक्टस प्रा. लि. या कंपनीने घर देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची केलेली फसवणूक

**(३१) * ७०५९७ श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहर व परिसरात मध्यमवर्गीयांना चार ते सहा लाख रुपयांत घर देण्याचे आमिष दाखवून आर.के.कन्स्ट्रो प्रोजेक्टस प्रा. लि. या कंपनीचे मालक समीर मेहता यांनी फसवणूक केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर कंपनीने औरंगाबाद येथेही सामान्य नागरिकांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आर.के.कन्स्ट्रो प्रोजेक्टस प्रा. लि. या कंपनीचे मालक समीर मेहता यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच गुंतवणूकदारांना रक्कम परत देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी नांदेड जिलह्यामधील कुठल्याही पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा अगर तक्रार दाखल केलेली नाही.
(२), (३) व (४) आर.के.कन्स्ट्रो प्रोजेक्टस प्रा.लि. या कंपनीचे मालक समीर मेहता यांच्या विरुध्द औरंगाबाद येथील आर.के.कन्स्ट्रो प्रोजेक्टस मधील सदनिका धारकांनी सदनिकांचे बांधकाम अपूर्ण असल्याबाबत तसेच ठरलेल्या वेळेत सदनिकांचा ताबा देत नसल्याबाबत तक्रार अर्ज दिले असून त्याची चौकशी चालू आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या भिवंडी येथील निर्मल शौचालय व वस्ती शौचालय योजनेतील गैरव्यवहाराबाबत

**(३२) * ६९८७८ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) अंतर्गत भिवंडी शहरात गरीब कुटुंबाकरिता निर्मल शौचालय व वस्ती शौचालयासाठी सुमारे ७० ते ८० कोटी रुपये खर्च झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एमएमआरडीएने दिलेल्या निर्देशानुसार प्रत्येक शौचालय चालविण्यासाठी त्याच भागात राहणाऱ्या नागरिकांचे समूह गट नेमायला हवे असतांना ही बेकायदेशिररित्या महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी बाहेरचे ठेकेदार नेमुन सदर योजनेत गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) निर्मल शौचालय व वस्ती शौचालयाचे कामासाठी मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेला रुपये ५७.७१ कोटी इतके अनुदान प्राप्त झाले होते.
(२) हे खरे नाही.

मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या मागदर्शक सूचनेनुसार महिला बचत गट, सेवाभावी संस्था महिला मंडळे, यांना १२८ वस्ती स्वच्छतागृहाचे स्वच्छता व परिचलनाचे काम देण्यात आलेले आहे.

उर्वरीत ७९ वस्ती स्वच्छता गृह परिचलन करणेकरीता कोणत्याही संस्था महिला मंडळे / बचत गट इच्छूक नसल्याने महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत स्वच्छता व देखभाल करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील कुलस्वामीनी तुळजाभवानी मंदिराच्या दानपेटीतील कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३) * ६५३४१ श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.धैर्यशील पाटील (पेण), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर (जि. उस्मानाबाद) येथील कुलस्वामीनी तुळजाभवानी मंदिराच्या दानपेटीतील ७ कोटी १९ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे राज्य गुन्हे अन्वेषन विभागाने (सीआयडी) केलेल्या चौकशी अहवालातून माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारास आयएएस अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, ठेकेदार तसेच मंदिराचा कारभार पाहणारे व राजकारणी असे एकूण ६२ व्यक्ती जबाबदार असल्याचे उक्त अहवालामार्फत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने गैरव्यवहारा प्रकरणी जबाबदार असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी सन १९९१ ते २००९ या कालावधीतील घटनाबाबत गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करण्यात येत असून गुन्हे अन्वेषण विभागाने अद्याप कोणताही अंतीम निष्कर्ष काढलेला नाही. त्यामुळे शासनास अहवाल सादर झालेला नाही.
(४) अद्याप चौकशी चालु आहे.

-----------------

## सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्हयातील युवकांना नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक करण्यात आल्याबाबत

**(३४) * ६६६७४ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्हयातील दहावी पास-नापास अनेकांना नोकरीचे आमिष दाखवून प्रत्येकी पाच लाख रुपये घेऊन अनेकांना तीन कोटी पेक्षा जास्त रुपयांना फसविल्या प्रकरणी आजरा पोलिस स्टेशन मध्ये माहे सप्टेंबर, २०१६ च्या सुमारास तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. कोल्हापूर जिल्हयात रु.२०.५० लक्ष रकमेच्या फसवणूकीबाबत २ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे.

(२) सदर प्रकरणी आजरा पोलीस ठाणे येथे रु.५.५० लक्षच्या फसवणूकी प्रकरणी गु.र.नं.१२२/२०१६ भा.दं.वि.सं. कलम ४०६, ४२०, ४६४, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे दि.२४/०९/२०१६ रोजी ४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

तसेच करवीर पोलीस ठाणे येथे रु. १५.०० लक्षच्या फसवणूकी प्रकरणी गु.र.नं. ३६६/२०१६ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ३४ प्रमाणे दि. २४/१०/२०१६ रोजी ३ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील गुन्हे तपासावर आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्यात पोलीसांवरील हल्ल्यांच्या घटनेमध्ये वाढ झाली असल्याबाबत**

**(३५) * ६५२८६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ**

**बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.आशिष देशमुख (काटोल), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथे गणेशमूर्ती विसर्जनाच्या वेळी बंदोबस्तासाठी कर्तव्यावर असलेल्या पोलीस उपनिरीक्षकांना गणेश विसर्जनाच्या तलावात बुडवून मारण्याचा प्रयत्न तसेच नाशिक येथील तपोवन चौफुली येथे नाकाबंदीद्वारे वाहन तपासणी सुरु असतांना एका टोळक्याने पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या अंगावर रिक्षा घालून मारण्याचा प्रयत्न केल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील खार येथील एस.व्ही. रोडवरील मॅक्लॉरईड पेट्रोलपंपावर मुंबई पोलीस वाहतुक विभागात कार्यरत असलेले वाहतुक पोलीस शिपाई श्री. विलास शिंदे यांचे दोन दुचाकीस्वारांनी केलेल्या हल्यात निधन झाले असल्याचे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असून दोघांपैकी एका आरोपीला अटक झाल्याचे व दुसरा आरोपी फरार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात माहे जानेवारी, २०१४ ते जुलै, २०१६ या कालावधीत ९९८ पोलिसांवर हल्ले झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या असून त्यापैकी अमरावती व पुणे येथे अशा घटनांची संख्या जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी करुन मृत झालेल्या वाहतूक पोलीस शिपायांच्या कुटुंबियांना कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली वा येत आहे,

(५) तसेच दिवसेंदिवस पोलीसांवरील वाढत असलेल्या हल्ल्यांना रोखण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कल्याण येथे गणेश विसर्जनावेळी कर्तव्यावर असलेल्या पोलीस उप निरीक्षकांना मारहाण केल्या प्रकरणी कोळसेवाडी पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. ३०५/२०१६ भा.द.वि. कलम ३०७, ३५३, १८६, ३३२, ३२३, ३४ सह क्रिमीनल अमेंडमेंट ॲक्ट ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर प्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्व अटक आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर गुन्ह्याचे दोषारोप पत्र मा. न्यायालयात

दाखल करण्यात आला आहे. तसेच नाशिक येथील तपोवन चौफुली येथे कर्तव्यावर असलेल्या पोलीस शिपायाच्या अंगावर रिक्षा चढवून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याबाबत उपनगर पोलीस ठाणे नाशिक शहर येथे गु. र. क्र. ४००/२०१६ भा.द.वि. कलम ३०७, ३५३, १४३, १४७, १४९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर प्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्व अटक आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

(२) सदर प्रकरणी खार पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ३९८/२०१६ भा.द.वि. कलम ३०२, ३५३, ३४ सह मोटार वाहन अधिनियम कलम ४(१), १८१, १२९, १३०(१), १७७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात २ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी १ आरोपी विधीसंघर्षग्रस्त बालक असून त्यास अटक करुन मा. बाल न्यायालय, डोंगरी, मुंबई यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तर दुस-या आरोपीस अटक करण्यात आली असून सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. सदर प्रकरणाचे दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

(३) पोलीस आयुक्त अमरावती शहर येथे पोलीसांवरील हल्ला झाल्याचे सन २०१४ मध्ये १६, सन २०१५ मध्ये ७, माहे जुलै २०१६ पर्यंत ६ गुन्हे दाखल आहेत. तसेच, पुणे शहर हद्दीमध्ये सन २०१४ मध्ये ७३, सन २०१५ मध्ये ८७, माहे ऑक्टोबर २०१६ पर्यंत ७८ गुन्हे दाखल आहेत.

(४) दि. २९.११.२००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय असलेल्या सर्व सोयी सुविधा मृत झालेल्या वाहतूक पोलीस शिपायांच्या कुटूंबियांना दि. ०९.०९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये मंजुर करण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने मृत पोलीस शिपायाच्या सेवानिवृत्त होईपर्यंतचे वेतन व भत्ते तसेच मृत झालेल्या कर्मचा-यांच्या कुटूंबास किमान रु. १.५ लक्ष किंवा अंतिम वेतनाच्या २० पट इतके सानुग्रह अनुदान देय आहे.

(५) राज्यातील पोलीसांवरील हल्ल्यासंदर्भात करावयाच्या कारवाईबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने दि. ०६.१०.२०१६ अन्वये राज्यातील पोलीस घटक कार्यालयांना प्रतिबंधात्मक व उपायात्मक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महात्मा फुले नगर, कुलाबा, मुंबई येथील एस.आर.ए. प्रकल्पाबाबत**

**(३६) * ६६८७३ श्री.अमित घोडा (पालघर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले नगर, कुलाबा, मुंबई येथील एस.आर.ए प्रकल्पामधील विकासक श्री.दानिश मर्चंट यांनी संबधित अधिका-यांच्या संगनमताने परिशिष्ट नं.२ बनवून एसआरएचे अधिका-यांना खोटी माहिती देऊन अनेक पात्र झोपडीधारकांना परिशिष्ट नं.२ मध्ये पात्र असतानाही सदनिका अथवा घरभाडे दिले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने झोपडीधारकांना घर देण्याचे आमिष दाखवून कागदपत्रावर सहया घेतल्या असून कुलाबा विभागातील अधिकारी यांनी विकासकांचा फायदा होईल असाच निकाल दिला असल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन त्यांची बदली करण्याची व विकासकांवर मोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी झोपडीधारकांनी पोलिस महासंचालक, मुंबई यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकांचे चालू असलेले बांधकाम बंद करुन व अपात्र ठरलेल्या झोपडीधारकांची पुन्हा चौकशी करुन त्यांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) सी.एस.क्र.१९८०, फोर्ट डिव्हीजन, कुलाबा या मिळकतीवरील महात्मा फुले सहकारी गृहनिर्माण संस्थेचे परिशिष्ट-२ दि.१२/२/२००७ रोजी प्रमाणित केले आहे.

सदर योजनेमध्ये ८ झोपडीधारकांनी भाडे देण्याबाबतची तक्रार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे केली. त्यापैकी ३ व्यक्ती अपात्र आहेत. उर्वरित ५ झोपडीधारक पात्र आहेत परंतू त्यांनी स्वत:च्या झोपडीची विक्री केल्यामुळे त्यांना भाडे देता येणार नाही, असे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविले आहे.

(२) अशाप्रकारे तक्रार प्राप्त झाल्याची पोलीस ठाण्याच्या अभिलेख्यावर नोंद नाही, असा पोलीसांचा अहवाल आहे.

(३) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी पात्रतेबाबत दिलेल्या किंवा अन्य कोणत्याही आदेशाविरुध्द या कायद्याच्या ३५ अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे तसेच त्यानंतर मा.उच्चस्तरिय समितीकडे अपील करण्याची तरतूद आहे. त्यानुसार संबंधितांना अपिल दाखल करता येतील. त्यासाठी योजनेतील बांधकाम थांबविण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था (जि.बुलडाणा) येथील कच्चा माल खरेदी विक्रीत झालेला गैरव्यवहार**

**(३७) * ७०३१४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उदयोजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था (जि.बुलडाणा) येथे सन २०१५-१६ व २०१६-१७ मधील कच्चामाल खरेदी विक्री प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कच्चामाल खरेदी व्रिक्री प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पण झाले व त्यानुसार संबंधीतांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माहीम (मुंबई) परिसरातील पाटीलवाडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील गैरव्यवहाराबाबत**

**(३८) * ६७४०२ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर**

**(पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहीम परिसरातील पाटीलवाडी येथील १६३ क्रमांकाच्या भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत विकासकाने बनावट लाभार्थी दाखवून उभारलेल्या १८ मजली व्दारकामाई या इमारतीत सर्व नियम धाब्यावर बसवून जिल्हाधिकारी आणि एसआरएतील अधिकाऱ्यांच्या संगनमताने १०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सध्यस्थिती काय आहे?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

परंतु सदर झोपडपट्टी पुनर्वसन याजनेविषयी अशा आशयाचे वृत्त दि.३०/९/२०१६ रोजीच्या दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झाले आहे.

(२) जिल्हाधिकारी यांच्याकडे नाही परंतु झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे योजनेतील इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम केल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे.

(३) व (४) सदर योजनेतील संयुक्त इमारतीमधील पोडियम मजल्यावर विकासकाचे अनधिकृतपणे बांधण्यात आलेले कार्यालय व रिफ्युज एरीयाच्या गैरवापराबाबत झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार संबंधित विकासकाविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना कायदा, १९६६ च्या तरतुदीनुसार अनधिकृत बांधकाम स्वत:च्या जबाबदारी व स्व:खर्चाने ३० दिवसात निष्कासित करण्याची नोटीस दिनांक ३/११/२०१६ रोजी प्राधिकरणाकडून देण्यात आलेली आहे.

----------------

## राहू (ता.दौड, जि.पुणे) येथील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेवर पडलेला दरोडा

**(३९) * ६६९८६ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहू (ता.दौड, जि.पुणे) येथील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेवर दिनांक १० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास दरोडेखोरांनी दरोडा टाकून सुमारे ६५ लाख ५७ हजार ४८७ रुपयांची रक्कम चोरुन नेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरून सहा आरोपींविरूद्ध यवत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु.र.नं. ६२२/२०१६ भां.द.वि. कलम ३९४, ३४२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयातील तीन आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचे तपासामध्ये अटक केलेल्या आरोपीपैकी एका आरोपीकडून रू. ६१,७०६/- जप्त केले आहेत. तसेच रू. १९,५६,००६/- एवढ्या किंमतीचे सोन्याचे दागिने व एक चार चाकी वाहन जप्त करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील इतर तीन आरोपींना अटक करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. गुन्हा तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईहून ठाणे-कासारवडवली पर्यंत येणाऱ्या मेट्रो रेल्वे सेवेचा विस्तार भिवंडी-कल्याण पर्यंत करण्याबाबत

**(४०) * ६९५३९ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी व कल्याण शहरातील वाढती रहदारी व वाढता विकास पाहता मुंबईहून ठाणे-कासारवडवली पर्यंत येणाऱ्या मेट्रो रेल्वे सेवेचा विस्तार भिवंडी-कल्याण पर्यंत करण्याबाबत तसेच भिवंडी शहराचा स्मार्ट सिटी म्हणून समावेश करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनीधींनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी शहरातील वाढती लोकसंख्या, पॉवरलूम व्यवसाय व भिवंडी येथून शासनाला करोडो रुपयांचा प्राप्त होणारा महसूल या बाबी विचारात घेता मुंबई मेट्रोचा विस्तार भिवंडी-कल्याण पर्यंत करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी पालकमंत्री यांच्याकडे माहे जुलै-ऑगस्ट, २०१४ पासून अनेकवेळा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने भिवंडी-कल्याण मेट्रो रेल्वे सेवेस मंजूरी देऊन काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) व (४) ठाणे-भिवंडी- कल्याण परिसरातील वेगाने होणारा विकास लक्षात घेता दैनंदिन प्रवाशांची संख्या अंदाजित करणे, संरेखन, तपासणी तसेच सर्व तंत्रज्ञ यांचा विचार करुन कार्यक्षम परिवहन सेवेच्या निवडीबाबतचा अभ्यास करुन अहवाल तयार करण्याकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेसर्स डी. ऑपोलोनिया एसपीए जीनिवा, इटाली आणि टीसीई लि. मुंबई (संयुक्त उपक्रम) यांची सल्लागार म्हणून फेब्रुवारी, २०१५ मध्ये नियुक्ती केली. सदर सल्लागाराकडून प्रकल्पाचा अंतिम सविस्तर प्रकल्प अहवाल माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालातील शिफारशीनुसार मेट्रो मार्ग-५ ठाणे भिवंडी-कल्याण या मेट्रो मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १४१ व्या बैठकीत मान्यता दिली असून पुढील कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे.

-----------------

**राज्यातील पोलीसांकरिता घरे उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४१) * ६५५६० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीसांकरिता घरे उपलब्ध करून देण्यासाठी ठाणे, पुणे, नाशिक यासारख्या शहरात जागा उपलब्ध नसल्याने सदर योजनेत बऱ्याच अडचणी येत असून शहरी भागांच्या आसपास असलेल्या जागांचा शोध घेऊन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी गृह विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये मा. मुख्यमंत्री यांनी घोषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, असल्यास अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) तसेच घाटकोपर येथे पोलीसांसाठी आठ हजार घरांची स्मार्ट टाऊनशिप उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास त्याचे स्वरूप काय आहे व यासाठी किती खर्च अपेक्षित आहे,

(४) तसेच पोलीसांकरिता घरे बांधण्यासाठी इतर कोणकोणत्या ठिकाणी जागा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे. पोलीस विभागाकडे असलेल्या विविध जागा व त्या जागा विकसित करण्याबाबत पर्याय काय असावेत याचा आढावा घेण्यासाठी अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.
(३) घाटकोपर येथील पोलीस विभागाच्या जागेवर (अंदाजित) निवासस्थानांचे नियोजन महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या, वरळी, मुंबई मार्फत करण्याचे सुरु आहे.
(४) महाराष्ट्र राज्यातील पोलीस विभागाकडे उपलब्ध असलेल्या जागेवर निधीच्या उपलब्धतेनुसार निवासी इमारती बांधण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवत ( ता.दौंड, जि.पुणे) येथील जे.के.ऍडव्हर्टायझिंग कंपनीमार्फत महिलांची फसवणूक करण्यात आल्याबाबत

**(४२) * ६७४०१ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवत ( ता. दौंड, जि.पुणे) येथे जे.के.ऍडव्हर्टायझिंग नावाच्या बनावट कंपनी मार्फत महिलांचे बचत गट तयार करुन त्यांना ५ ते ७ लाख रुपयांचे कर्ज १ ते २ टक्क्याने मिळवून देण्याचे आमिष दाखवून कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी ४२ महिलांकडून १४ लाख ७०० रुपये घेवून फसवणूक केल्या प्रकरणी दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजी यवत पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी दोन आरोपींविरूद्ध यवत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु.र.नं. ५५४/२०१६ भां.द.वि. कलम ४२०,३४ प्रमाणे दिनांक १३/०८/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हयातील एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचे तपासात आरोपीचे मुंढवा , केशवनगर पुणे येथील ऑफिसची झडती घेवून महिला बचत गटाचे पासबूक तसेच धनादेश व बचतगटातील महिलांचे करारनामे जप्त करण्यात आलेले आहेत. तसेच सदर गुन्हयातील दुसऱ्या आरोपीस अटक करण्याची कार्यवाही चालू आहे. गुन्हा तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दादर, नायगाव (मुंबई) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग आणि माधव दास पास्ता मार्गावरील आरक्षित भूखंडावर अनधिकृतरित्या उभारलेली इमारत**

**(४३) * ६६८२९ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर, नायगाव (मुंबई) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग आणि माधवदास पास्ता मार्गावरील शारदा मॅन्शनच्या मागे असलेल्या सीटी सर्वे क्र.२०/७६ या भूखंडातील ७७३ चौ.मी. जागा कलम १२६ अन्वये सार्वजनिक शौचालयासाठी आरक्षित ठेवण्यात आली असतानाही ही जागा एका विकासकाने बेकायदेशीरपणे ताब्यात घेऊन त्यावर महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता ३ मजली अनधिकृत इमारत उभी केली असून सदर इमारतीला लागूनच आणखी एका इमारतीचे बांधकामही विकासकाने सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक कार्यकर्ते श्री. काशिनाथ सुर्वे यांनी माहितीच्या अधिकाराखाली या जागेची संपूर्ण माहिती मिळवून सदरहू विकासकाच्या अनधिकृत बांधकामाबाबत सहाय्यक आयुक्त एफ दक्षिण विभाग यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१६ च्या पहिल्या पंधरवडयात वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दादर, नायगाव (मुंबई) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग आणि माधवदास पास्ता मार्गावरील शारदा मॅन्शनच्या मागे असलेल्या सी.एस.क्र. २०/७६ हा भूखंड खाजगी मालकीचा असून, या जागेवर सार्वजनिक स्वच्छतागृहे व रोड डेपोचे आरक्षण असून ते निवासी पट्टयामध्ये वसलेले आहे. जागेचा ताबा सध्या मालकाकडे असून सदर ठिकाणच्या विकासकाचा प्रस्ताव सादर झालेला नाही.

सदर ठिकाणी ३ मजली अनधिकृत इमारत उभी नाही. तथापि, सन १९६१ पूर्वीची ३ टॉलरेटेड (Tolerated) बांधकामे आहेत, त्यापैकी १ बांधकाम ३ मजली आहे.

त्याशिवाय, सदर ठिकाणी ५ अनधिकृत बांधकामे आहेत.

तसेच अस्तित्वात असलेल्या ३ टॉलरेटेड (Tolerated) बांधकामांपैकी एका बांधकामावर पहिल्या मजल्याचे वाढीव अनधिकृत बांधकाम सुरु करण्यात आले होते.

(२) हे खरे आहे.

(३) सदर ठिकाणी असलेल्या ५ अनधिकृत बांधकामांपैकी ३ अनधिकृत बांधकामांसंदर्भात महानगरपालिकेमार्फत सन २००८ व सन २०१० मध्ये मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये अनधिकृत बांधकामाच्या निष्कासनासाठी नोटीसा बजावण्यात आल्या होत्या.

तथापि, सदर नोटीसींविरुध्द मा. नगर दिवाणी व सत्र न्यायालयात दावे क्रमांक बी.सी.सी.सी. क्र. ३८०/२०१०, ४०८/२०१० व २३७/२०११ अन्वये दावे दाखल करण्यात आले असून, मा. न्यायालयाने दिनांक २५.०२.२०१० व दिनांक २८.०१.२०११ रोजीच्या आदेशाने “जैसे थे” आदेश पारित केलेले आहेत.

तसेच, अनिवार्य मोकळया जागेत बांधलेल्या व अस्तित्वात असलेल्या पहिल्या मजल्याच्या गच्चीवर बांधलेल्या तात्पुरत्या शेडला महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम ५५(१) अन्वये सन २०१० मध्ये नोटीसा बजावण्यात आल्या असून, पक्षकाराने मा. उच्च न्यायालयात सी. ए. एफ.

क्रमांक ४४९/२०१३ व ४५२/२०१३ अन्वये अपील दाखल केले आहेत. सदर अपीलावर दिनांक २६.०२.२०१३ रोजी मा. उच्च न्यायालयाने “जैसे थे” आदेश पारित केले आहेत.

सदर ठिकाणी भूखंड मालकाने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये अस्तित्वात असलेल्या तळमजल्यावर सुरु केलेले पहिल्या मजल्याचे वाढीव अनधिकृत बांधकाम दिनांक १६.०८.२०१६ रोजी निष्कासित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई खाडी बंदरातून वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या ट्रक चालकाकडून लाच घेताना पोलीस उपनिरीक्षक व पोलीस शिपाई यांना अटक करण्यात आल्याबाबत**

**(४४) * ६९०३३ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई खाडी बंदरातून वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या ट्रक चालकाकडून १० हजार रुपयांची लाच घेताना विरार पोलीस दूरक्षेत्र अंतर्गत मांडवी पोलीस चौकीतील पोलीस उपनिरीक्षक तुषार भदाणे व पोलीस शिपाई बाबासाहेब शेलार यांना पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडल्याची बाब दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रमजीवी संघटनेच्या नेतृत्वाखाली दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी तहसिल कार्यालयावर वाळू ठेकेदार, मजुर व ट्रकचालक यांनी मोर्चा काढून पोलीसांच्या हफ्त्याचे छापिल रेटकार्ड तहसिलदारांना सादर करुन पोलीसांचा गैरव्यवहार व भ्रष्टाचार निदर्शनास आणला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलीस उपनिरीक्षक व पोलीस शिपाई यांनी अनेक ट्रक मालकांकडून यापूर्वी लाखो रुपयांची लाच घेतल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वाळूची चोरटी वाहतुक करणाऱ्या ट्रक चालकाकडून रुपये १० हजाराची लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी दि. १७.१०.२०१६ रोजी पोलिस उपनिरीक्षक श्री. तुषार शालीग्राम भदाणे व पोलिस शिपाई श्री.बाबासाहेब शेलार यांना रंगेहाथ पकडले आहे.

(२) श्रमजीवी संघटनेकडून दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी तहसिल कार्यालयावर मोर्चा काढण्यात आलेला नाही.

(३) प्रस्तुत गुन्ह्याचा तपास चालू असून सदर मुद्द्यांबाबत तपासात अद्याप निष्पन्न झालेले नाही.

(४) व (५) या प्रकरणी आरोपी लोकसेवक श्री.तुषार शालीग्राम भदाणे, पोलिस उपनिरीक्षक व श्री.बाबासाहेब शेलार, पोलिस शिपाई दोघेही मांडवी पोलिस चौकी, विरार पोलिस ठाणे यांना दि. १८.१०.२०१६ रोजी अटक करण्यात आली असून त्यांना दि. २४.१०.२०१६ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे.

----------------

## कल्याण-डोबिवली महापालिका परिवहन उपकमासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाबाबत

**(४५) * ६६७५५ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिका परिवहन उपक्रमासाठी आरक्षित असलेल्या जागेवर खासगी विकासकाकडून इमारतीचे बांधकाम सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागेवर परिवहन उपक्रमाचे आगार विकसित होत असून या आगाराचे उद्घाटन दिनांक २२ जानेवारी, २०१५ मध्ये झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त आरक्षण क्रमांक १०८ नुसार हा भूखंड आगारासाठी आरक्षित असतांना खासगी विकासकाकडून होत असलेल्या बांधकामासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी विकासकाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मौजे गंधारे येथील भूमापन क्र.२१पै, २२पै व २३/४पै हा १४९००.०० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा भुखंड महानगरपालिकेच्या विकास योजनेनुसार 'कल्याण महानगर परिवहन' या वापराकरीता आरक्षित आहे. यापैकी १३९०० चौ.मी. क्षेत्रास महानगरपालिकेकडून रेखांकन मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

शासन निर्णय, नगर विकास विभाग दि.०८ जुलै, २००९ अन्वये विहित करण्यात आलेल्या समावेशक आरक्षणाच्या धोरणानुसार सदर भुखंड क्षेत्राच्या ४० टक्के म्हणजे ५५६० चौ.मी. इतके क्षेत्र महानगरपालिकेस परिवहन उपक्रमाकरीता हस्तांतरीत करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाकरीता विकासकाने बांधून द्यावयाच्या बांधिव क्षेत्राकरीता शासनाच्या Annual Statement of Rates नुसार येणाऱ्या रु.२,६६,८८,०००/- एवढ्या रकमेचा भरणा संबंधित विकासकाने महानगरपालिकेस केला आहे.

परिवहन उपक्रमाकरीता असलेला भुखंड वगळता स्वतंत्र भुखंडावर कल्याण-डोंबिवली महानगर- पालिकेकडून संबंधित विकासकास दि.२८/०१/२०१५ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली असून त्यानुसार त्यांच्याकडून बांधकाम करण्यात येत आहे.

(२) दि.२२ जानेवारी, २०१५ रोजी सदर प्रस्तावित बस आगार व पायाभूत सुविधा बांधकामाचे भूमिपुजन करण्यात आले आहे.

(३) शासनाच्या समावेशक आरक्षणाच्या धोरणानुसार दिलेल्या मंजूरीप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कामराज नगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई येथील ओम साई गणेश गृहनिर्माण संस्थेच्या मूळ रहिवाश्यांची फसवूणक झाल्याबाबत

**(४६) * ६५९५० श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निलम फायनान्स बॉम्बे प्रा.लि.चे विकासक श्री चंपकलाल वर्धन यांच्यामार्फत

घाटकोपर (पूर्व) येथील कामराज नगर मधील सीटीएस क्र.१९५, सर्वे क्र.२४९ या क्षेत्रावर ओम साई गणेश गृहनिर्माण संस्थेच्या सन २००७ सालापासून राबविण्यात आलेल्या एसआरए प्रकल्पातील मूळ रहिवाशांना अदयापपावेतो इमारतीत सदनिका देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, पुनर्वसित झालेल्या इमारतींमध्ये १८ महिन्यांच्या आत मूळ रहिवाश्यांना सदनिका वितरीत करण्यात येतील असा करार झालेला असतानाही अदयापपावेतो रहिवाश्यांना सदनिका मिळालेल्या नसल्यामुळे संक्रमण शिबीरात रहावे लागत असून संक्रमण शिबीराची मुदतही दिनांक १० सप्टेंबर, २०१० रोजी संपलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्प राबविण्यासाठी झो.पु. प्राधिकरणाने तळमजला अधिक १३ मजले अशी इमारत बांधण्यासाठी परवानगी दिलेली असताना विकासकाने सदरहू परवानगीचे उल्लंघन करून अनधिकृतररित्या तळमजला अधिक १५ मजल्याचे बांधकाम केले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

मौजे घाटकोपर, न.भू.क्र.१९५ पै, तत्सम सर्वे क्र.२४९ (पै) या भूखंडावर ओम साई सह.गृह.संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना विकासक मे.निलम फायनान्स (बॉम्बे प्रा.लि.) यांचे मार्फत राबविण्यात येत आहे. सदरहू योजनेच्या अभिन्यासामध्ये ३ पुनर्वसन घटकाच्या व १ विक्री घटकाची इमारत प्रस्तावित आहे. सद्य:स्थितीत पुनर्वसन घटकातील इमारत क्र.२ अे मधील ३९५ सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून, इमारत क्र.२ बी मधील २४५ सदनिकांसाठी दि.८/११/२०१६ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(२) सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांसाठी ४ तात्पुरत्या संक्रमण शिबीर इमारतीचे आराखडे दि.२/१०/२००९ रोजी मंजूर करण्यात आले असून त्यानुसार सन २०१० मध्ये बांधकाम करण्यात आले आहे. त्यानंतर तात्पुरत्या संक्रमण शिबीर इमारतीचे सुधारित आराखडे दि.२८/५/२०१२ रोजी मंजूर करण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत तळ + ४ मजल्यांच्या ४ तात्पुरत्या संक्रमण शिबीर इमारती बांधण्यात आल्या आहेत.

(३) सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये विकासकाने अनधिकृतरित्या व विनापरवानगी तळमजला + १५ मजल्यांचे बांधकाम केले असल्याचे आढळून येत नाही.

(४) सदरहू योजनेतील पुनर्वसन इमारत क्र.१ चे तळ + ११ मजल्याचे आराखडे दि.३/७/२००९ रोजी मंजूर करुन दि.२६/१२/२०११ रोजी जोत्यापर्यंतच्या बांधकामाची परवानगी दिली होती. तथापि, विकासकाने परवानगीशिवाय केलेले तळ + ३ मजल्यांचे बांधकाम रु.५०,७१,५००/- इतके दंडात्मक शुल्क आकारुन नियमित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोटे आद्योगिक वसाहत (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील गरुडा केमिकल्स कंपनीत वायुगळती होऊन कामगाराचा मृत्यु झाल्याबाबत

**(४७) * ६५९२१ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.संजय कदम (दापोली), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) लोटे औद्योगिक वसाहतीतील प्लॉट क्र.बी ४६ मध्ये असलेल्या गरुडा केमिकल्स या कंपनीत दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास वायुगळती होऊन एका कामगाराचा मृत्यु व एक जण गंभीर जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) तसेच मृत्यु पावलेल्या व जखमी झालेल्या कामगाराच्या कुटुंबियांना शासनातर्फे तसेच कंपनीतर्फे कोणती आर्थिक मदत करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

खेड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) लोटे औद्योगिक वसाहतीतील गरुडा केमिकल्स, एम.आय.डी.सी. लोटे-परशुराम या कारखान्यात दि.११ ऑगस्ट, २०१६ रोजी वायुगळती झालेली नसून दोन कामगारांना काम करताना रसायनाच्या वाफांची बाधा झाली. उपचारा दरम्यान एका कामगाराचा मृत्यू झाला व दुसरा कामगार उपचारानंतर बरा होऊन कामावर रुजु झालेला आहे.

(२) होय,

सदर प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कोल्हापूर तसेच पोलिस विभाग, ता.खेड, जि.रत्नागिरी यांनी चौकशी केली आहे.

चौकशीत असे आढळून आले की, सदर कारखान्यात इथेलिन ग्लायकॉल मोनो सॅलिसिलेट या रसायनाचे उत्पादन करण्यासाठी टू-क्लोरो इथेनॉल हा कच्चा माल वापरला जातो. घटनेच्या दिवशी दोन कामगार उघड्या कारबॉयमधील टू-क्लोरो इथेनॉल हे रसायन हाताळत असतांना त्या रसायनाच्या वाफा निर्माण झाल्या. दोन्ही कामगारांनी सुरक्षा साधने न वापरल्यामुळे त्यांना बाधा झाली.

(३) सदर घटनेत मृत्यु झालेल्या कामगाराच्या कुटुंबियांना कारखाना व्यवस्थापनातर्फे आर्थिक मदत म्हणून सानुग्रह अनुदान रु.१०,००,०००/- (रु.दहा लाख) अदा करण्यात आले आहेत. तसेच मृत कामगारांच्या कुटुंबियाना नुकसान भरपाई मिळण्यासाठी मा.आयुक्त श्रमिक नुकसान भरपाई यांच्याकडे पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे, पिंपरी-चिंचवड, सांगली, कोल्हापूर व अहमदनगर मधील संस्कार ग्रुपने गुंतवणूकदारांची कोटयावधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(४८) * ६६९९४ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, पिंपरी-चिंचवड, सांगली, कोल्हापूर व अहमदनगर येथील विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याच्या नावांखाली सात वर्षापूर्वी स्थापन झालेल्या संस्कार ग्रुपने

आर्थिक गुंतवणूकीवर अधिक परताव्याचे आमिष दाखवून हजारो गुंतवणूकदारांची कोटयावधी रुपयांची फसवणूक केल्याचे दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे, पिंपरी-चिंचवड, सांगली, कोल्हापूर व अहमदनगर येथील विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याच्या नावाखाली सात वर्षापूर्वी स्थापन झालेल्या संस्कार ग्रुपने आर्थिक गुंतवणूकीवर अधिक परताव्याचे आमिष दाखवून हजारो गुंतवणूकदारांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत पुणे पोलीस आयुक्तालय, सांगली, कोल्हापूर व अहमदनगर जिल्हा पोलीस क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे गुन्हे दाखल नाहीत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बालेवाडी (पुणे) येथील पार्क एक्सप्रेस या गृह प्रकल्पातील स्लॅब कोसळून मजूरांचा झालेला मृत्यू

**(४९) * ६७०१५ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालेवाडी (पुणे) येथील पार्क एक्सप्रेस या गृह प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील इमारतीच्या तेराव्या मजल्यावर बेकायदा स्लॅब टाकण्याचे काम सुरु असताना स्लॅब कोसळून ९ मजूर मृत्यूमूखी पडले तर २ मजूर गंभीर जखमी झाल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीला मान्य एफएसआय पेक्षा जास्तीचा किती एफएसआय मंजूर करण्यात आला तसेच मान्य आराखडयाशिवाय बेकायदेशीर बांधकाम करण्यात आल्याचे व मजूरांच्या सुरक्षिततेसाठी इमारतींना जाळीही लावण्यात आलेली नसल्याचे केलेल्या पाहणीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार संबंधित बांधकाम व्यावसायिकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत तसेच मृत मजुरांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२)

- सदर गृहप्रकल्पामध्ये अनुज्ञेय एफ.एस.आय १.०० नुसार इमारतीस तळमजला + १२ मजल्या पर्यंत बांधकाम परवानगी देण्यात आलेली होती. त्याव्यतीरीक्त कोणताही जास्तीचा एफ.एस.आय मान्य करण्यात आलेला नाही.
- मंजूर एफ.एस.आय पेक्षा जास्त एफ.एस.आय. वापरुन विनापरवानगी तेराव्या मजल्याचे बांधकाम करण्यात येत होते.
- मजुरांच्या सुरक्षिततेकरीता सदर इमारतीस बाहेरील बाजूने जाळी लावण्यात आली होती. सदर जाळी अपघाताच्या वेळी तुटली असल्याचे दिसून आलेले आहे.

(३) व (४)

पुणे महानगरपालिकेकडून संबंधित गृह प्रकल्पाचे काम थांबविण्यात आले आहे.

पुणे महानगरपालिकेने बांधकाम व्यवसायिक व इतर संबंधित व्यक्तीं विरुध्द पुढील कार्यवाही केलेली आहे-

- श्री. श्रीनिवास प्राईड पर्पल प्रॉपर्टीज एलएलपी यांचे विरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमच्या १९६६ कलम ५२ अन्वये कलम ९२ दि. २९.७.२०१६ रोजी चतुश्रृंगी पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
- संबंधित विकासक श्री.अरविंद जैन, श्री. श्रावण अगरवाल, श्री. शामकांत वाणी, श्री. कैलास वाणी, श्री. श्रीनिवास प्राईड पर्पल प्रॉपर्टीज यांची बांधकाम व्यावसायीक म्हणून नोंदणी रद्द केलेली आहे.
- श्री. हंसलाल पारेख ॲण्ड असोसिएशन, स्ट्रक्चरल इंजिनियर यांची नोंदणी रद्द केली आहे.
- सदर गृहप्रकल्पाचे अभियंता श्री. प्रदीप कोसुंबीकर यांची नोंदणी रद्द केलेली आहे.
- सदर गृह प्रकल्पातील विनापरवाना १३ व्या मजल्याचे छत तोडण्यात आले आहे.

पोलिसांमार्फत करण्यात आलेली कारवाई:-

- चतुश्रृंगी पोलिस स्टेशन, पुणे येथे भा.द.वि. कलम ३०४, ३३७,३३८,३४ अंतर्गत तसेच महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट १९९३ अंतर्गत दि. २९.७.२०१६ रोजी गु.र.क्र.३२४/२०१६ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
- तसेच विकासकांसह मुख्य आरोपी फरार असून त्यांचा तपास सुरु आहे. फरार आरोपींनी मा. उच्च न्यायालयात अटक पुर्व जामीनासाठी अर्ज केला असून सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.
- श्री. भावीन हर्षद शहा, बांधकाम कॉन्ट्रॅक्ट इनचार्ज, श्री. संतोष सोपान चव्हाण, श्री. ज्ञानेश्वर लक्ष्मण चव्हाण श्री. श्रीकांत किसन पवार, व श्री. महेंद्र सदानंद कामत यांना अटक करण्यात आलेली आहे. आरोपींविरुध्द मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पुणे यांचेकडे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

कामगार विभागाकडून करण्यात आलेली कार्यवाही :-

- अपघातात मृत्यु पावलेल्या ९ मृत मजुरांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी अपर आयुक्त, कामगार, पुणे यांनी सदस्य, कामगार न्यायालय तथा आयुक्त, यांच्याकडे श्रमीक नुकसान भरपाई अधिनियम १९२३ अंतर्गत दि. ३०.७.२०१६ रोजी कळविण्यात आले आहे.
- तसेच संबंधित विकासकाच्या व्यवस्थापनाने द्यावयाच्या सुमारे ७७,६५,०००/- एवढ्या नुकसान भरपाईच्या रकमेचा धनादेश आयुक्त, श्रमिक नुकसान भरपाई पुणे यांच्या कार्यालयात जमा केली आहे. सध्या सदर प्रकरण न्यायालयात सुनावणीसाठी प्रलंबित आहे.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.